पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १९०। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शुक्रवार ०७/०८/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

# समितीचा फार्स की सरळ रेल्वेचा मार्ग मोकळा ?

## 'सरळ मार्गच हवा' मागणीसाठी क्रांतिदिनी चक्का जाम आंदोलन

## काकोडकर समितीला ६० दिवसांची मुदत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेमार्गाच्या प्रश्नावर राज्य सरकारने अखेर हालचाल करत अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. नारायणगाव येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) वर प्रस्तावित रेल्वेमार्गाचा होणारा संभाव्य परिणाम तपासण्यासाठी ही समिती पुढील ६० दिवसांत अहवाल सादर करणार आहे.

मात्र, हा निर्णय जाहीर होताच नाशिक, पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये एकच चर्चा सुरू झाली आहे समितीचा हा खरोखरच अभ्यास आहे की वेळकाढूपणा ?

कारण, गेल्या अनेक वर्षांपासून पुणे-संगमनेर-नाशिक हा सरळ रेल्वेमार्ग व्हावा, यासाठी हजारो नागरिक, शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि विविध सामाजिक संघटना सातत्याने लढा देत आहेत. २०१९ मध्ये या मार्गासाठी आरक्षण प्रक्रिया पूर्ण होऊन अनेक शेतकऱ्यांना सुमारे ३०० कोटी रुपयांची भरपाईही देण्यात आली होती. त्यानंतर सरकार बदलले आणि प्रस्तावित मार्ग शिर्डी-अहिल्यानगरकडे वळविण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली. आता नव्याने स्थापन झालेली समिती मूळ पुणे-संगमनेर-नाशिक मार्गासह शिर्डीमार्गे प्रस्तावित पर्यायी रेल्वेमार्गाचा जीएमआरटीवर होणारा विद्युतचुंबकीय हस्तक्षेप, तांत्रिक व्यवहार्यता, प्रवासाचा कालावधी, प्रकल्पाचा खर्च, भूसंपादन, औद्योगिक आणि कृषी क्षेत्राशी जोडणी तसेच सामाजिक-आर्थिक परिणामांचा सखोल अभ्यास करणार आहे. बोगदे, एलिव्हेटेड ट्रॅक किंवा इतर आधुनिक तांत्रिक पर्यायांचाही विचार समिती करणार आहे.

केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असताना पुन्हा समिती नेमण्याची गरज काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सरकारला प्रकल्प करायचाच असेल तर थेट घोषणा करावी. समितीच्या नावाखाली वेळ घालवून जनतेची दिशाभूल करू नये, अशी भावना आंदोलनकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. सरळ रेल्वेमार्गासाठी आता जनआंदोलन निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहे. क्रांतिदिनाचे औचित्य साधून ९ ऑगस्ट रोजी नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील विविध ठिकाणी रास्ता रोको आणि चक्का जाम आंदोलन करण्यात येणार आहे. संगमनेर तालुक्यात हिवरगाव पावसा टोल नाका येथे हजारो नागरिक सहभागी होण्याची शक्यता असून प्रशासनाचेही या आंदोलनाकडे लक्ष लागले आहे. (पान ६ वर)

### प्रश्न जनतेच्या विकासाचा... राजकारणाचा नाही!

सिन्नर – अकोले – संगमनेर – नारायणगाव – आंबेगाव –राजगुरुनगर – चाकण या सरळ रेल्वे मार्गामुळे लाखो नागरिकांचे भविष्य उज्ज्वल होणार आहे.

शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना नवी बाजारपेठ, वाहतुक कोंडीला पर्याय

विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी, युवकांना रोजगार, उद्योगांना गती,

आदिवासी व ग्रामीण भागाला विकासाची नवी दिशा

हा रेल्वे मार्ग म्हणजे केवळ रेल्वे नाही तर ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा महामार्ग आहे. दैनिक युवावार्ता सुरुवातीपासून या जनहिताच्या प्रश्नावर सातत्याने अग्रेसर भूमिका मांडत आहे. जनतेच्या न्याय्य मागणीला कायम पाठिंबा देत आहे. चला... विकासासाठी एकत्र येऊया! पुणे–नाशिक सरळ रेल्वे मार्गासाठी आपला आवाज बुलंद करूया!

ग्रामीण भागातील गावकऱ्यांनो, शेतकऱ्यांनो, दुध उत्पादकांनो, तरूणांनो या चळवळीत प्रचंड संख्येने सहभागी व्हा. तरच हा जीवन मरणाचा रेल्वे प्रश्न मार्गी लागेल.

**दैनिक युवावार्ता "जनतेच्या प्रश्नांसाठी... जनतेच्या बाजूने!"**

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
दैनिक युवावार्ता कार्यालय
निवेदन
दिनांक १ ऑगस्ट २०२६ पासून
दैनिक युवावार्ता जाहिरात दरात बदल
खालीलप्रमाणे करण्यात आले असून
जाहिरातदार व जाहिरात प्रतिनिधींनी नोंद घ्यावी.
छोटी जाहिरात साईज - ४x५ से. मी.
५ दिवसांसाठी -५०० रू. , १० दिवसांसाठी - ८०० रू.
नावात बदल जाहिरात
साईज ४X५ से. मी. - २०० रू.
वारस नोटीस , जन्म - मृत्यू जाहिरनामा
साईज - ८X६ से. मी. - ७०० रू.
जाहिरातीसाठी संपर्क - ८२७५४००८१७
E-mail- dailyyuvavarta@gmail.com

# घुलेवाडीचा पाणी प्रश्न महिनाभरात मार्गी लावा

## गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांचे ग्रामपंचायत प्रशासनाला निर्देश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पाणीपुरवठा विभागाच्या अनागोंदी कारभाराची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती स्थापन करून दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, तसेच घुलेवाडीचा पाणीप्रश्न येत्या महिनाभरात मार्गी लावा असे निर्देश गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी घुलेवाडी ग्रामपंचायत प्रशासनाला दिले.

घुलेवाडी गावातील पाणीटंचाईच्या प्रश्नावर ग्रामस्थांनी पंचायत समिती प्रवेशद्वारावर उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी गंभीर दखल घेत तातडीने त्यांच्या दालनामध्ये उपोषणकर्ते आणि घुलेवाडी ग्रामपंचायत प्रशासन यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत लाखो रुपये खर्च करून घुलेवाडी ग्रामपंचायतने प्रवरा नदीवरून पाईप लाईन आणली होती. मात्र प्रवरा नदीला पूर आल्यानंतर ती पाईपलाईन वाहून गेली आहे. त्यामुळे नदीला पाणी असूनह घुलेवाडी गावासह उपनगरात पावसाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. यावर पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी



ग्रामपंचायतीने काय उपाययोजना केली तसेच निळवंडे डाव्या कालव्यामध्ये मळीमिश्रित पाण्यामुळे ते पिण्यायोग्य नाही असे एकामागे एक अनेक प्रश्न ग्रामस्थांनी गटविकासअधिकारी सिनारे यांच्यापुढे उपस्थित केले. प्रवरा नदीच्या पुरात वाहून गेलेली पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन बाबतचे अंदाजपत्रक(इस्टिमेट) तयार करून भविष्यामध्ये अशी समस्या निर्माण होणार नाही, यासाठी कायम स्वरूपी पाईप लाईन टाकण्याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी असे सक्त निर्देश गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी घुलेवाडी ग्रामपंचायतीच्या प्रशासनास दिले. तसेच निळवंडे डाव्या कालव्यातून मळीमिश्रित पाणी सोडण्यात आल्याची गंभीर बाब गट विकास अधिकाऱ्यांपुढे उपस्थित केली त्यावर निळवंडे पाटातून येणारे पाणी पिण्यायोग्य नसून तपासणी अहवाल निगेटिव्ह आला असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी चांगदेव दरेकर यांनी दिली. ग्रामस्थांनी केवळ या अहवालावरती समाधान न मानता पाण्याचे नमुने मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासूनच नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करावा. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ देऊ नये, अशी मागणी केली. त्यावर जोपर्यंत वाहून गेलेली पाईपलाईन दुरुस्त होत नाही, तोपर्यंत घुलेवाडी गावाला आणि उपनगराला बारव तसेच इतर दोन विहिरींमधून पर्यायी पाणीपुरवठा करण्याबाबतचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती दरेकर यांनी दिली. तसेच ग्रामपंचायत प्रशासनाने गावातील नागरिकांना किमान चार दिवसांतून नियमितपणे पाणी कसे मिळेल यासाठीचेनियोजन केले जाईल असे दिले.

ADVANCE GOLD -SIP- SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रक्कमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
खरेदीवर आकर्षक गिफ्ट
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

## कोतूळमध्ये 'माकप'चा मोर्चा

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोतूळ - कोतूळ व परिसरातील वीज समस्यांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांसह मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (माकप) वतीने कोतूळ येथे मोर्चा काढून प्रशासनाला जाब विचारण्यात आला.

कॉ. सदाशिव साबळे यांच्या नेतृत्वाखाली कोतुळ बसस्थानकापासून महावितरणच्या उपकेंद्रापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. परिसरातील विविध वीजविषयक समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. मोर्चानंतर राजूर उपविभागीय

कार्यालयाचे सहाय्यक अभियंता श्री. सोनवणे यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले.

# महिलेला २५ तोळे सोन्याला गंडा

## नथ घातल्याने अंगदुखी दूर होईल

अहिल्यानगर - विधी केलेली सोन्याची नथ घातल्यास अंगदुखी कायमची दूर होईल, असा बनाव करत विवाहितेचे दहा लाखांचे दागिने लांबविल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हा प्रकार दि. ५ ते २५ जुलै दरम्यान अहिल्यानगर शहरात घडला. याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात बुधवारी (दि. ४) पती-पत्नीविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

गणेश ऊर्फ टिंग्या मसुदेव पोटे व त्याची पत्नी वर्षा गणेश पोटे (दोघे रा. अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. वृषाली महेश भगत (रा. अहिल्यानगर) असे फसवणूक झालेल्या विवाहितेचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शुगर असल्याने त्यांचे अंग दुखत होते. त्या माहेरी आल्या होत्या. त्यांच्या वडिलांचा दुधाचा व्यवसाय असल्याने ५ जुलै रोजी एक व्यक्ती दूध घेण्यासाठी आला. त्याने तुमचे काही दुखते का, असे फिर्यादीला विचारले. फिर्यादीने अंग दुखत असल्याचे सांगितले. मी आताच मढी येथून आलो असून, माझ्याकडे पावडर आहे, ती पावडर तुम्हाला देतो. पावडर पाण्यातून घेतल्यास अंगदुखी थांबेल, असे आरोपी फिर्यादीला म्हणाला. त्याबदल्यात त्याने फिर्यादीकडून ५० हजार रुपये घेतले. त्यानंतर आरोपीने पुन्हा फिर्यादीकडे सोन्याची मागणी केली. गुरूकडून विधी केलेली नथ आणून देतो, असे म्हणत फिर्यादीकडून वेळोवेळी २५ तोळे सोन्याचे दागिने घेतले. परंतु, सोन्याची नथ दिली नाही. सोन्याची नथ मागितली असता आरोपीने धमकी दिली.

आरोपीने फिर्यादी महिलेकडून वेळोवेळी सोन्याचे दागिने घेतले. त्याने त्याच्या पत्नीला दागिने घेण्यासाठी बालिकाश्रम रोड परिसरातील एका मंदिरात पाठविले. फसवणुकीत आरोपीच्या पत्नीचा समावेश असून, दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

## राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे



मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील माहि गेल्या काही महिन्यांपासून रखडलेल्या महिला आणि युवक प्रदेशाध्यक्षपदांच्या नियुक्या बुधवारी जाहीर करण्यात आल्या. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी संघटनात्मक फेरबदलांना गती देत महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी वैशाली नागवडे तर युवक प्रदेशाध्यक्षपदी निखील ठाकरे यांची नियुक्ती केली आहे. मुंबईतील देवगिरी निवासस्थानी बंगल्यावर सुनेत्रा पवार यांच्या हस्ते दोन्ही पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

भोंदूबाबा खरात प्रकरणावरून तत्कालीन प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यानंतर महिला प्रदेशाध्यक्षपद रिक्त होते. तसेच तत्कालीन युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत शेतकरी नेत्यांना मारहाण केल्याप्रकरणी त्यांची पदावरून हकालपट्टी करण्यात आली होती.

## कर्जमाफी यादीत नाव नसल्याने दोघांची आत्महत्या

नांदेड (वृत्तसंस्था)

कर्जमाफीच्या यादीत नाव न आल्याच्या नैराश्यातून नांदेड जिल्ह्यातील दोन शेतकऱ्यांनी एकाच दिवशी दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. पिराजी गायकवाड (वय ७०, रा. बोरगाव, ता. लोहा) यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून सुमारे ६० हजार रुपयांचे पीक कर्ज घेतले होते. कर्जमाफी यादीत नाव नसल्याने मंगळवारी सायंकाळी त्यांनी गळफास घेतला. गायकवाड यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, असा परिवार आहे.

याच नैराश्यातून हिमायतनगर तालुक्यातील वारंगटाकळी येथील शेतकरी चंद्रभान दादाराव कदम (वय ६०) यांनी मंगळवारी/विष प्राशन करून स्वतःच्या शेतात आत्महत्या केली.

चंद्रभान कदम यांना ७ एकर जमीन ग्रामीण बँकेचे एक ते सव्वा लाख त्यांच्यावर आहे. कर्जमाफी योजनेत यादीत आपले नाव यावे, यादीत नाव घ्यावे यासाठी त्यांनी बँकेच्या अनेक फेऱ्या मारल्या होत्या. मात्र यादीत नाव आल्याने आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत न मिळाल्याने ते प्रचंड मानसिक तणावात होते. याच नैराश्यातून त्यांनी शेतातील आखाड्यावर विष प्राशन करून आत्महत्या केल्याची माहिती मुलगा निवृत्ती कदम यांनी दिली.

# व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढे यावे - सभापती राम शिंदे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर (जिमाका): आजचा तरुण हा देशाच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार आहे. तरुणांनी कोणत्याही परिस्थितीत व्यसनाच्या आहारी जाऊ नये तसेच व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्या व्यक्तींना त्यापासून परावृत्त करून व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन केले विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.



पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'नशामुक्त भारत' या संकल्पनेचा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात जनजागृतीला चालना दिली जात असल्याचे सांगितले. तरुणांनी व्यसनापासून दूर राहून आपले भविष्य घडवावे असे आवाहन करत जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने राबविलेल्या या जनजागृती अभियानाचे त्यांनी कौतुक केले.

अहिल्यानगर जिल्हा पोलिस दलातर्फे अंमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. 'एक निर्धार, एक संकल्प, एक भविष्य' व्यसनमुक्ती जिल्ह्याच्या दिशेने एक सामूहिक पाऊल या संकल्पनेवर आधारित या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने शहरात व्यसनमुक्त रॅलीचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी शहरातील अनेक शाळा, महाविद्यालयांनी या रॅलीमध्ये सहभाग नोंदविला.

यावेळी आ. विक्रमसिंह पाचपुते, आ. काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मक्का सुदर्शन, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

सभापती प्रा. शिंदे म्हणाले की, तरुणांची ऊर्जा, बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व हे राष्ट्राच्या प्रगतीचे आधारस्तंभ आहेत. मात्र अंमली पदार्थ आणि व्यसनांच्या वाढत्या विळख्यामुळे अनेक तरुणांचे शिक्षण, करिअर, आरोग्य आणि कुटुंबीयांचे सुख धोक्यात येत आहे.अहिल्यानगरचे भविष्य उज्ज्वल राहिले तरच राज्याचे आणि पर्यायाने देशाचे भविष्य उज्ज्वल होणार आहे. तरुणांनी देखील या अभियानाचा भाग होऊन चुकीच्या गोष्टी करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध माहिती देऊन पोलिसांना सहकार्य करावे. तरुणांनी व्यसनाच्या नाही तर स्वप्नांना होकार देण्याचे आवाहन विधान परिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी यावेळी केले.

## ब्राम्हणवाड्यात अवैध दारू विक्री पकडली

### १० लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनधी)

अकोले - अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने ४ ऑगस्ट रोजी दारू विक्री विरोधात धडक कारवाई करत चार आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले. या कारवाईत एकूण १० लाख ५२ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने एका माहितीच्या आधारे ही कारवाई केली. ब्राम्हणवाडा ४ ऑगस्ट रोजी पथक अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना येथील ब्राम्हणवाडा-बोटा मार्गावरील एका पत्र्याच्या शेडमध्ये अनिष बाबू पटेल हा बेकायदेशीरपणे देशी-विदेशी मद्याची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून अनिष बाबू पटेल, नदीम याकुब पटेल आणि नाजीम पटेल सर्व रा.

ब्राम्हणवाडा, ता. अकोले यांना ताब्यात घेतले. तपासणीत आरोपींकडून ४९ हजार रुपयांच्या १७० रुपयांच्या देशी-विदेशी मद्याच्या बाटल्या, ५१ हजार

३३० रुपयांचे दोन मोबाईल, ६०० रुपये रोख, १ लाख रुपयांची टीव्हीएस ज्युपिटर दुचाकी आणि ८ लाख ५० हजार रुपयांची हुंडाई कंपनीची एमएच-१७-जेए-४९४६ क्रमांकाची कार एकूण १० लाख ५१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपींविरुद्ध अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास अकोले पोलीस करीत आहेत. याच कारवाईदरम्यान ब्राम्हणवाडा येथील हॉटेल सम्यक येथे उत्तम आनंद शिंदे ३४, रा. ब्राम्हणवाडा) हा बेकायदेशीरपणे देशी दारू विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडून १ हजार ७९० रुपयांचा देशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याच्याविरुद्ध अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# FDA चा मोठा निर्णय

## राज्यात 'ॲनालॉग पनीर'वर वर्षभर बंदी



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात नालॉग पनीरच्या विक्री, साठवण आणि वापरावर पुढील एक वर्षासाठी बंदी घालण्यात आली आहे. अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत अन्न व औषध प्रशासनाने याबाबत आदेश जारी केला असून तो राजपत्रातही प्रसिद्ध करण्यात आला आहे. मात्र, नियमानुसार तयार केलेल्या प्रमाणित दुग्धजन्य पनीरच्या विक्रीवर कोणतेही निर्बंध लागू नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

नालॉग किंवा नॉन-डेअरी पनीर हे दिसायला पनीरसारखे असले तरी त्यामध्ये दुधातील स्निग्धांश किंवा दुग्धघन पूर्णतः अथवा अंशतः काढून त्याऐवजी वनस्पती तेल, वनस्पती स्निग्धांश किंवा इतर दुग्धेतर घटकांचा वापर केला जातो. अशा उत्पादनाची 'पनीर' म्हणून विक्री किंवा ग्राहकांना सेवा देण्यास आता बंदी घालण्यात आली आहे. एफडीएच्या आदेशानुसार, पनीर हा अन्न सुरक्षा नियमांनुसार प्रमाणित दुग्धजन्य पदार्थ आहे. त्यामुळे त्यात दुधातील स्निग्धांशाऐवजी इतर कोणत्याही दुग्धेतर घटकांचा वापर करून तयार केलेले उत्पादन 'पनीर' म्हणून विकता येणार नाही. अशा उत्पादनाला कायद्यानुसार 'दुग्ध संदर्भातील नालॉग' मानले जाईल.

या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालये, केटरर्स, क्लाऊड किचन आणि इतर अन्नसेवा आस्थापनांवर होणार आहे. अशा ठिकाणी नालॉग पनीरचा वापर, साठवण, विक्री किंवा ग्राहकांना सेवा देण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच, पनीरचे उत्पादन, पॅकिंग, साठवण, वितरण किंवा विक्री करणाऱ्या सर्व अन्न व्यावसायिकांनी अन्न सुरक्षा व मानके (लेबलिंग व प्रदर्शन) विनियम, २०२० नुसार आवश्यक माहिती पॅकेजवर स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक राहणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही एफडीएने दिला आहे.

# 'एसआयआर' मोहिमेला १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात सुरू असलेल्या विशेष सघन मतदार यादी पुनरिक्षण म्हणजेच 'एसआयआर' मोहिमेला (डखठ उरारिळसप) १७ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात सरासरी ७५ टक्के एसआयआर प्रक्रीया पूर्ण झाली असून मुंबई, ठाणेसारख्या भागातील डिजिटायझेशनचे प्रमाण ५० टक्केच्या आसपास आहे. या पार्श्वभूमीवर या प्रक्रीयेला मुदतवाढ देण्याची विनंती राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत केंद्रीय निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. त्यानुसार ही मुदतवाढ देण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाचे अवर सचिव संदीप कुमार यांनी मंगळवारी महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र पाठवून या सुधारित वेळापत्रकाची घोषणा केली. राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आलेल्या विनंतीची दखल घेत आयोगाने ही मुदतवाढ आणि नवीन वेळापत्रक मंजूर केले आहे. उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या अचूक आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार, १७ ऑगस्टपर्यंत बीएलओ घराघरांत जाऊन मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी पूर्ण करतील. त्याच दिवशी मतदान केंद्रांचे तर्कसंगतीकरण आणि पुनर्रचना करण्याचे काम पार पडेल. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी मसुदा मतदार यादी जाहीर केली जाईल. या मसुदा यादीवर नागरिकांना, राजकीय पक्षांना आपले दावे आणि हरकती २३ सप्टेंबरपर्यंत नोंदवता येतील. (डखठ उरारिळसप)प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकतींची सुनावणी घेऊन ते निकाली काढण्याची प्रक्रिया २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर या कालावधीत पूर्ण केली जाईल. यानंतर सर्व आवश्यक दुरुस्त्या, नव्या मतदारांची नोंदणी आणि दुबार अथवा मृत मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया पूर्ण करून २७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# कॉमर्स : भारताच्या आर्थिक भविष्याचा भक्कम पाया

भारतातील शिक्षणव्यवस्थेचा इतिहास पाहिला तर प्रत्येक दशकाने विद्यार्थ्यांसमोर नवी आव्हाने आणि नवनव्या संधी उभ्या केल्या आहेत. एकेकाळी डॉक्टर, अभियंता किंवा सरकारी अधिकारी होणे म्हणजेच यश मानले जात होते. मात्र आज भारताची अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान आणि जागतिक व्यापार झपाट्याने बदलत असून या बदलाच्या केंद्रस्थानी कॉमर्स शाखा आहे.




गेल्या वीस वर्षांपासून संगमनेर येथे विद्यार्थ्यांना कॉमर्सचे मार्गदर्शन करताना हा बदल जवळून अनुभवला आहे. पूर्वी कॉमर्स म्हणजे लेखाशास्त्र, बँकेतील नोकरी किंवा बी.कॉम.पर्यंतचे शिक्षण एवढीच त्याची ओळख होती. आज मात्र कॉमर्स म्हणजे डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), जागतिक वित्तव्यवस्था, उद्योजकता आणि अमर्याद करिअरच्या संधी.

**बदलत्या भारताची गरज**

भारत जगातील वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. वित्तीय सेवा, डिजिटल देयक व्यवस्था, ई-व्यापार, वित्त-तंत्रज्ञान (फिनटेक), शेअर बाजार, विमा, करप्रणाली आणि जागतिक व्यापार या क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होत आहे. या प्रत्येक क्षेत्रासाठी प्रशिक्षित लेखापाल, करसल्लागार, वित्तीय विश्लेषक, आर्थिक नियोजक आणि व्यवस्थापन कौशल्य असलेल्या तरुणांची गरज वाढत आहे.

**कॉमर्सची बदललेली ओळख**

एकेकाळी सायन्सला प्रवेश मिळाला नाही म्हणून कॉमर्स अशी चुकीची धारणा होती. पण आज अनेक गुणवंत विद्यार्थी जाणीवपूर्वक कॉमर्सची निवड करतात. या शाखेतून सनदी लेखापाल (CA), कंपनी सचिव (CS), खर्च व व्यवस्थापन लेखापाल (CMA), गुंतवणूक सल्लागार, वित्तीय विश्लेषक, करसल्लागार, लेखापरीक्षक, उद्योजक किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदांवर काम करण्याच्या संधी उपलब्ध आहेत.

**राष्ट्रीय शिक्षण धोरणाची दिशा**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) ने शिक्षणात कौशल्याधारित दृष्टिकोनाला प्राधान्य दिले आहे. बहुविषयक शिक्षण, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगारक्षमतेवर भर देण्यात आला आहे. आज उद्योगांना केवळ पदवीधर नव्हे, तर समस्या सोडवणारे, तंत्रज्ञान जाणणारे आणि सातत्याने शिकणारे विद्यार्थी हवे आहेत.

**कौशल्येच ठरवतील भविष्य**

आजच्या रोजगार बाजारात केवळ गुणपत्रिका पुरेशी नाही. संवाद कौशल्य, इंग्रजीवरील प्रभुत्व, डिजिटल कौशल्ये, माहिती विश्लेषण, संघभावना, नेतृत्व, सादरीकरण आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर ही कौशल्ये तितकीच महत्त्वाची ठरत आहेत. उद्योगांना आता पदवीधारकापेक्षा कौशल्यसंपन्न युवक अधिक महत्त्वाचा वाटतो.

**कृत्रिम बुद्धिमत्ता : संधीची नवी दिशा**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे नोकऱ्या कमी होतील, अशी भीती अनेकांना वाटते. प्रत्यक्षात ती नवीन संधी निर्माण करत आहे. लेखाशास्त्र, करप्रणाली, लेखापरीक्षण, वित्तीय विश्लेषण आणि व्यवसाय व्यवस्थापनात -ख चा वापर झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचा अभ्यास करून त्याचा प्रभावी वापर शिकणे आवश्यक आहे.

**ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी नवी दारे**

सामाईक विद्यापीठ प्रवेश परीक्षा (उणएढ) मुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही देशातील नामांकित विद्यापीठांमध्ये गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश मिळू लागला आहे. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांतील अंतर कमी होत आहे.

**जागतिक करिअरच्या संधी**

आंतरराष्ट्रीय व्यावसायिक पात्रता (ACCA) मुळे भारतीय विद्यार्थ्यांसाठी जगभर रोजगाराच्या संधी खुल्या झाल्या आहेत. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आणि जागतिक वित्तीय संस्था अशा पात्र उमेदवारांना प्राधान्य देतात.

**उद्योजक घडविणारी शाखा**

कॉमर्सची सर्वात मोठी ताकद म्हणजे ती विद्यार्थ्याला केवळ नोकरी शोधणारा नव्हे, तर रोजगार निर्माण करणारा बनवते. व्यवसाय नियोजन, गुंतवणूक, आर्थिक व्यवस्थापन, विपणन, करप्रणाली आणि जोखीम व्यवस्थापन यांचे भक्कम ज्ञान या शाखेतून मिळते. त्यामुळे स्टार्टअप, कौटुंबिक व्यवसाय किंवा नवीन उद्योग उभारण्यासाठी कॉमर्स विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध होते.

**निष्कर्ष**

आजचा काळ कॉमर्स विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधीचा आहे. भारताची वाढती अर्थव्यवस्था, राष्ट्रीय शिक्षण धोरण, डिजिटल क्रांती, कृत्रिम बुद्धिमत्ता, जागतिक शिक्षण आणि बदलती रोजगार बाजारपेठ यामुळे कॉमर्स शाखेला अभूतपूर्व महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत तंत्रज्ञान, संवादकौशल्य, इंग्रजी, डिजिटल साधने आणि व्यावसायिक कौशल्ये आत्मसात केली, तर ते भारतातच नव्हे तर जगभर यशस्वी होऊ शकतात. कॉमर्स ही पर्यायाची शाखा नाही; ती संधी, स्वावलंबन, उद्योजकता आणि जागतिक यशाची शाखा आहे. भारताच्या आर्थिक प्रगतीच्या केंद्रस्थानी कॉमर्स आहे.

**प्रा. सचिन किशोर कसाब**

**संचालक, एस. के. कॉमर्स क्लासेस, संगमनेर**

## व्हाईस ऑफ मीडिया राज्य कार्यकारिणीत गोरक्ष नेहे व गायत्री ढवळे यांची निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - व्हाईस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या राज्य कार्यकारिणीत संगमनेरचे पत्रकार गोरक्ष नेहे यांची राज्य संयोजक, तर श्रीगोंदा येथील महिला पत्रकार गायत्री ढवळे यांची राज्य कोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे व प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के यांनी ही घोषणा केली.





गोरक्ष नेहे यांनी पत्रकारिता व संघटनात्मक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यामुळे ही जबाबदारी मिळवली असून, गायत्री ढवळे यांनीही संघटनेच्या कार्यात सक्रिय योगदान दिले आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल पत्रकार व विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९९७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# मुद्रांक विक्रेत्यांची तहसीलदारांकडून कानउघाडणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील मुद्रांक (स्टॅम्प पेपर) विक्रेत्यांकडून नागरिकांची होत असलेली पिळवणूक आणि टायपिंगची सक्ती याबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची तातडीने दखल घेत संगमनेरचे तहसीलदार धिरज मांजरे यांनी मुद्रांक विक्रेत्यांची विशेष बैठक बोलावून त्यांना कडक शब्दांत समज दिली. नागरिकांची गैरसोय अथवा आर्थिक पिळवणूक होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी बैठकीत दिला.

संगमनेर शहरात आवश्यक मुद्रांक सहज उपलब्ध होत नसल्याची, तसेच मुद्रांक घेताना संबंधित विक्रेत्यांकडून टायपिंग करून घेण्याची सक्ती केली जात असल्याची गंभीर बाब नागरिकांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. टायपिंग नको असल्यास मुद्रांकाच्या किमतीपेक्षा ३० ते ५० रुपये अधिक आकारले जात असल्याचाही आरोप करण्यात आला होता.

काही ग्राहकांनी पतसंस्थेच्या कर्जप्रकरणासाठी मुद्रांक खरेदी करताना संबंधित मजकूर अथवा मायना हा पतसंस्थेकडूनच उपलब्ध करून दिला जातो, तरीदेखील मुद्रांक विक्रेत्यांकडून अनावश्यक टायपिंगची सक्ती केली जात असल्याची खंत व्यक्त केली होती. त्यामुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंडासह मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही समोर आले.

या प्रकाराची गंभीर दखल घेत नवनाथ वावरे यांनी तहसीलदार धिरज मांजरे यांच्याकडे व्हॉट्सॲपद्वारे लेखी तक्रार केली होती. त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचे सविस्तर वृत्त दैनिक युवावार्तात प्रसिद्ध झाले. या वृत्तानंतर मुद्रांक विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली.

# पेसा कर्मचाऱ्यांच्या लढ्याला यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - राज्यातील ३००० पेसा कर्मचाऱ्यांपैकी केंद्र सरकारच्या निधी कपातीमुळे २००० कर्मचाऱ्यांवर नोकरी गमावण्याचे संकट आले होते. हे संकट टाळण्यासाठी व प्रत्येक पेसा ग्रामपंचायतला एक याप्रमाणे पेसा कर्मचाऱ्यांची ३००० पदे नियमित ठेवण्यासाठी,आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच व पेसा कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने राज्यात जोरदार आंदोलन सुरू होते.

आझाद मैदान येथे भर पावसात मागील महिन्यात झालेल्या आंदोलनानंतर आता पेसा मोबिलायझरची पदे कमी करू नये या मागणीसाठी दिनांक ४ ऑगस्ट पासून आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांच्या राळेगाव येथील कार्यालयासमोर पेसा मोबिलायझर संघर्ष समितीच्या वतीने बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मा. आदिवासी विकास मंत्री यांनी आंदोलन सुरू होण्याच्या अगोदरच संघटनेची संपर्क साधत मंत्रालयामध्ये आज दिनांक ५ ऑगस्ट रोजी बैठक आयोजित केली होती. या बैठकीला आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके व ग्रामविकास मंत्री मा.जयकुमार गोरे तसेच या दोन्ही विभागाचे प्रधान सचिव व संबंधित अधिकारी उपस्थित होते. आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच व पेसा मोबिलाईझर संघर्ष समितीच्या वतीने डॉ.अशोक ढवळे, कॉ. मरियम ढवळे, डॉ. अजित नवले, आ. विनोद निकोले, डॉ. अमोल वाघमारे, नासीर हाश्मी व पेसा मोबिलाईझर प्रतिनिधी यामध्ये प्रतीक्षा पाटील,सुरेश पवार, रविताबाई पाडवी, खुलनाबाई तुमराम, अर्चना पेंदाम, इंदिरा भोये आदी उपस्थित होते.

सर्व ३००० पेसा कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारने पुरेसा निधी द्यावा यासाठी राज्य सरकारच्या वतीने पाठपुरावा सुरू आहे. या पाठपुराव्याला यश येईपर्यंत ३००० पदे पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहतील व केंद्र सरकारचा पुढील निर्णय येईपर्यंत यासाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद आदिवासी विकास विभागाच्या वतीने केली जाईल असे या बैठकीच्या वेळी दोन्ही मंत्री महोदयांच्या वतीने जाहीर करण्यात आले.

# अवयवदान जनजागृतीसाठी सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे प्रभावी पथनाट्य



युवावार्ता (प्रतिनिधी )-

संगमनेर - अवयवदान - सर्वश्रेष्ठ दान हा सामाजिक संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयाच्या रचना शरीर विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या अंगदान - जीवन संजीवनी अभियान अंतर्गत प्रथम वर्ष बी.ए.एम.एस.च्या विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खांडगाव येथे जनजागृतीपर पथनाट्य सादर चला जिवंत राहूया.. या नावाच्या पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांनी अवयवदानाचे महत्त्व, त्यातून अनेकांना मिळणारे नवजीवन आणि समाजाने अवयवदानाबाबत सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज प्रभावी अभिनयातून मांडली. पथनाट्य पाहून शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती निर्माण झाली.

या पथनाट्याचे लेखन कु. अपेक्षा पेड यांनी केले असून, डॉ. अपूर्वा जगताप मॅडम यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रचना शरीर विभागाचे प्रमुख डॉ. मिलिंद सदगीर सर, डॉ. प्राची दुधात मॅडम आणि डॉ. अपूर्वा जगताप मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खांडगाव येथे झालेल्या या उपक्रमासाठी मुख्याध्यापिका नीलिमा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकवृंदांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पथनाट्याचा आनंद घेतला आणि अंगदान हेच जीवनदान हा संदेश मनापासून आत्मसात केला.

या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक करत, अशा सामाजिक जनजागृतीपर कार्यक्रमांची ग्रामीण भागात सातत्याने आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

# इथापेच्या ६ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- डॉ. इथापे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, संगमनेर येथे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी मॉक इंटरव्ह्यू आयोजित करण्यात आले. या तयारीनंतर विद्यार्थ्यांना थेट नामांकित औषधनिर्माण कंपन्यांच्या इंटरव्ह्यू प्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. या उपक्रमातून अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या ६ विद्यार्थ्यांची देशातील प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये यशस्वी निवड झाली आहे.

IPCA Laboratories Ltd., गुजरात येथे साईश प्रकाश काकड (प्रोडक्शन विभाग), संकेत सतीश सांगळे (पॅकेजिंग विभाग), समेज दिनकर कुटे (क्वालिटी कंट्रोल विभाग) आणि बागवान नाझील तैय्यब (पॅकेजिंग विभाग) यांची निवड झाली असून सर्वांना २+ LPA पॅकेज मिळाले आहे. Emil Pharmaceutical Pvt. Ltd. मध्ये धनराज शुभाष गोराड (पॅकिंग विभाग) आणि निखिल नारायण वाघ (प्रोडक्शन विभाग) यांची निवड झाली असून त्यांनाही 2+LPA पॅकेज मिळाले आहे. संस्थेत दिल्या जाणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. या यशामुळे संस्थेच्या प्लेसमेंट यशात आणखी एका मानाच्या टप्प्याची भर पडली आहे.

या यशाबद्दल अध्यक्ष डॉ. अशोक इथापे, सचिव श्री. अनिकेत इथापे, प्राचार्य डॉ. महेंद्र गिरी, उपप्राचार्य डॉ. मनसुख अविनाश, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. निलेश गोसावी तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उच्चशिक्षित तरुणाचा आदर्श



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

उच्च शिक्षित तरुणाने आदिवासी एकता शेतकरी गट स्थापन करुन समाजा समोर आदर्श निर्माण केला आहे असे मत डॉ.किशोर पोखरकर यांनी व्यक्त केले आहे. ते अहमदनगर जिल्हा सेवानिवृत्त कर्मचारी अधिकारी संघा मार्फत वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार मिळालेल्या आदिवासी एकता शेतकरी गटाचे सन्मान समारंभात बोलत होते.

ते म्हणाले की, काटवणवाडी सारख्या छोट्याशा आदिवासी वाडीतील भीमा उघडे या एम एस्सी मायक्रो बायोलॉजी झालेल्या तरुणांने आपल्या समाजातील लोकांना एकत्र करुन आदिवासी एकता शेतकरी गट स्थापन केला व समाजाच्या उन्नतीसाठी महत्त्वाचे काम केले आहे. अनेक तरुण शिक्षित झाल्यानंतर नोकरीच्या मागे लागतात पण या तरुणांने समाज उन्नतीसाठी मोलाचे योगदान दिलेले आहे. हे अत्यंत कौतुकास्पद कार्य आहे. संस्थेचे सदस्य व माजी विभागीय वनाधिकारी शिवाजीराव फटांगरे म्हणाले की, आदिवासी एकता शेतकरी गटाने एकत्र येऊन सेंद्रिय शेतीचा यशस्वी प्रयोग केला आणि त्यातून समाजाच्या विकासासाठी प्रयत्न केले आहेत.

गटाचे सचिव भीमा उघडे यांनी आदिवासी एकता गटाची स्थापनेचा इतिहास आणि केलेल्या परिश्रमाची माहिती विषद केली. यशवंत फटांगरे सर यांनी आपले विचार मांडले. अहमदनगर जिल्हा सेवानिवृत्त कर्मचारी अधिकारी संस्थेच्यावतीने काटवणवाडी येथील अंगणवाडी व जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले व शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. किशोर पोखरकर, सचिव शांताराम डोंगरे,सह सचिव मोहम्मद मोमीन, संस्थेचे सदस्य माजी विभागीय वन अधिकारी शिवाजीराव फटांगरे, रामनाथ नेहे, डॉ.बबनराव फटांगरे, सुरेश फटांगरे, वत्सला पानसरे, बाळासाहेब फटांगरे,,मदन फटांगरे,मच्छिंद्र यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# लोकविद्या विकास फाउंडेशनतर्फे पिंपळे जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



संगमनेर - शिक्षण हा सामाजिक विकासाचा पाया असून प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून लोकविद्या विकास फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने संगमनेर तालुक्यातील मौजे पिंपळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या ३५ विद्यार्थ्यांना शालेय दप्तर (शालेय बॅग) व वॉटर बॉटलचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमाला प्राचार्य डॉ. आशिष चौरसिया यांचे विशेष सौजन्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे हा सामाजिक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि पालकांनी व्यक्त केलेला समाधानाचा भाव हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. या कार्यक्रमास लोकविद्या विकास फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. बाळासाहेब चकोर, प्राचार्य डॉ. आशिष चौरसिया, हेमा चौरसिया व अथर्व चकोर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब गाडेकर, श्रीमती गाडेकर मॅडम, राहुल भोजने (अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती), उपाध्यक्ष राजाराम कोटकर, शरद आंधळे, उत्तम वाकचौरे ज्ञानेश्वर गडाख, हरीश कोटकर, अर्जुन कोटकर, सागर ढोणे, प्रभाकर रघुनाथ चकोर, सुनील चकोर, संदीप ढोणे, बबन आंधळे, लक्ष्मण कोटकर, नुरा काझी, पिराजी कुसळकर पालक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकविद्या विकास फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. बाळासाहेब चकोर यांनी विद्यार्थ्यांना नियमित शिक्षण घेण्याचे, शिस्त, संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व सांगितले. समाजातील सक्षम घटकांनी गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतल्यास शिक्षणाची गोडी वाढून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही दृढ होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच संस्थेच्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणीय उपक्रमांची माहिती देत, भविष्यातही ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांसाठी अशाच प्रकारचे विधायक उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक बाळासाहेब गाडेकर यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या शेवटी सुनिल चकोर यांनी उपस्थित मान्यवर यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टचे वृक्षारोपण व संवर्धनातील काम मोठे डॉ. सुधीर तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- सजीव सृष्टीच्या रक्षणासाठी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या दंडकारण्य अभियानात नागरिक युवकांचा मोठा सहभाग राहिला आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हरितसृष्टीच्या संवर्धनासाठी सुरू असलेल्या या दंडकारण्य अभियानांतर्गत एसएनबीटी सेवाभावी ट्रस्टच्या वतीने मालदाड मच्छिंद्रनाथ गडावर ११ हजार पाचशे वृक्षांचे रोपण करण्यात आले असून त्याचे संवर्धन ग्रामस्थ करणार आहेत. ग्रामस्थ व एसएमबीटीच्या भावी डॉक्टरांनी श्रमदान करून पर्यावरण संवर्धनात मोठे काम केले असल्याचे प्रतिपादन दंडकारण्य अभियानाचे मुख्य प्रवर्तक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले आहे.

मालदाड येथील मच्छिंद्रनाथ गडावर एसएमबीटी सेवाभावी ट्रस्ट व मालदाड ग्रामस्थ यांच्या वतीने ११५०० वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी प्रकल्प प्रमुख सौ दुर्गाताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात, सरपंच गोरख नवले, समन्वयक प्रा दशरथ वर्पे, डेंटल कॉलेजचे प्राचार्य डॉ सतीश अब्राहम, प्रशासकीय अधिकारी डॉ. सुयोग तूपसाखरे, कार्यालयीन अधीक्षक रमेश दिघे, ग्रामपंचायत सदस्य सौ.भामाबाई नवले, सौ शालिनी नवले ,विलास नवले ,ज्ञानदेव नवले, संभाजी नवले, भाऊसाहेब नवले ,माधव नवले, यादव नवले यांच्यासह ग्रामस्थ महिला युवक व विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालदाडच्या मच्छिंद्रनाथ गडावर एसएमबीटी सेवाभावी संस्थेच्या वतीने सीसीटी करण्यात आले आहे. डोंगराच्या सर्व बाजूंनी या समतालचरांमध्ये विविध देशी ११५०० वृक्षांचे रोपण करण्यात आले आहे. मागील वर्षीही या ठिकाणी अनेक झाडांचे रोपण करण्यात आले होते. यामध्ये मालदड ग्रामस्थांचा व महिलांचा युवकांचा मोठा सहभाग राहिला आहे. अध्यात्म आणि पर्यावरण यांची सांगड घालून हा डोंगर अत्यंत सुंदर रीतीने हिरवा करण्यात आला आहे. डोंगराच्या सर्व बाजूने कडुलिंब, वड, पिंपळ, चिंच, आवळा, हिरडा, करंज, सीताफळ, करवंद, बांबू या झाडांचा समावेश आहे.

यावेळी बोलताना माजी आमदार डॉ सुधीर तांबे म्हणाले की, निरोगी शरीरासाठी जसे व्यायाम आहार महत्त्वाचा आहे तसे निरोगी सृष्टीसाठी पर्यावरण संवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे. कोरोना काळामध्ये ऑक्सिजन सर्वांना कळाला मात्र अनेक जण आता विसरून गेले. आपल्या सगळ्यांना ऑक्सिजन पुरवणारे वृक्ष आहेत आणि म्हणून प्रत्येकाने वृक्ष जपले पाहिजे.

## संपादकीय...

पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन

# रवींद्रनाथ टागोर शब्दांचा विश्वकवी

७ ऑगस्ट हा भारताच्या सांस्कृतिक, साहित्यिक आणि वैचारिक इतिहासातील एक भावपूर्ण दिवस आहे. आज भारताचे महान सुपुत्र, कवी, साहित्यिक, नाटककार, कादंबरीकार, चित्रकार, संगीतकार आणि तत्त्वज्ञ गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी आहे. आपल्या अद्वितीय साहित्यसंपदेने, राष्ट्रप्रेमाने आणि शिक्षणातील अभिनव प्रयोगांनी त्यांनी भारताला जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळवून दिले. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही साहित्य, संगीत, शिक्षण आणि संस्कृतीच्या प्रत्येक क्षेत्रात जाणवतो. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोरासांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी, तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. घरातील सांस्कृतिक वातावरणामुळे त्यांच्यावर लहानपणापासूनच साहित्य, संगीत आणि कलांचा प्रभाव पडला. त्यांनी शालेय शिक्षणाऐवजी घरीच विविध विषयांचे शिक्षण खाजगी शिक्षकांकडून घेतले. बालवयातच त्यांच्या प्रतिभेची झलक दिसू लागली. वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी पहिली कविता लिहिली, तर सोळाव्या वर्षी 'भानुसिंह' या टोपणनावाने अनेक कविता प्रकाशित केल्या. उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले आणि लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मात्र बॅरिस्टर होण्याचे शिक्षण पूर्ण न करता १८८० मध्ये ते भारतात परतले. त्यानंतर त्यांनी संपूर्ण आयुष्य साहित्यनिर्मिती, समाजजागृती आणि शिक्षण क्षेत्राला वाहून घेतले. रवींद्रनाथ टागोर यांचे 'गीतांजली' हे काव्यसंग्रह त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील सर्वोच्च शिखर ठरले. या काव्यसंग्रहासाठी १४ नोव्हेंबर १९१३ रोजी त्यांना साहित्यातील नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, गीतांजलीचे इंग्रजी भाषांतर त्यांनी स्वतः केले होते. या पुरस्कारामुळे ते भारताचे आणि आशियातील पहिले नोबेल पारितोषिक विजेते ठरले.

ब्रिटिश सरकारने १९१५ मध्ये त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'सर' ही पदवी बहाल केली. मात्र १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर ब्रिटिशांच्या अमानुष कृत्याचा निषेध म्हणून त्यांनी ही पदवी परत केली. हा त्यांच्या राष्ट्रप्रेमाचा आणि स्वाभिमानाचा सर्वोच्च आदर्श मानला जातो. रवींद्रनाथ टागोर यांचे योगदान केवळ साहित्यापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी रचलेले 'जन गण मन' हे भारताचे, तर 'आमार शोनार बांग्ला' हे बांगलादेशचे राष्ट्रगीत आहे. दोन स्वतंत्र राष्ट्रांची राष्ट्रगीते लिहिणारे ते जगातील एकमेव कवी आहेत. त्यांच्या गीतांनी आणि कवितांनी देशभक्ती, मानवता आणि विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. शिक्षण क्षेत्रातही त्यांनी मोठे कार्य केले. पारंपरिक शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला मर्यादा घालते, या विचारातून त्यांनी शांतिनिकेतनची स्थापना केली. निसर्गाच्या सान्निध्यात मुक्त वातावरणात शिक्षण देण्याचा त्यांचा प्रयोग त्या काळात अत्यंत क्रांतिकारक ठरला. पुढे याच संस्थेचे विश्वभारती विद्यापीठ म्हणून रूपांतर झाले. महाराष्ट्राशीही त्यांचे विशेष नाते होते. त्यांनी संत तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास करून काही अभंगांचे बंगाली भाषेत भाषांतर केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने प्रेरित होऊन त्यांनी त्यांच्यावर खंडकाव्यही रचले. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळींचा प्रभाव त्यांच्या विचारांवर स्पष्टपणे दिसून येतो. रवींद्रनाथ टागोर हे उत्कृष्ट साहित्यिक असण्याबरोबरच कुशल चित्रकार आणि संगीतकारही होते. त्यांनी दोन हजारांहून अधिक गीते रचली. 'रवींद्रसंगीत' ही संगीतशैली आजही बंगालच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. कविता, कथा, कादंबऱ्या, नाटके, निबंध आणि चित्रकला अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी अजरामर योगदान दिले. बंगाली साहित्यावर त्यांच्या प्रभावाची व्याप्ती इतकी मोठी आहे की साहित्याचा इतिहास 'रवींद्रपूर्व' आणि 'रवींद्रोत्तर' अशा दोन कालखंडांत विभागला जातो. त्यांच्या लेखनातून मानवी मूल्ये, निसर्गप्रेम, सामाजिक समता, राष्ट्रभक्ती आणि विश्वमानवतेचा संदेश सतत व्यक्त होत राहिला.

# पत्रकारितेच्या मूल्यांसाठी राज्यभर पत्रकार सक्षमीकरण अभियान - रविंद्र बेडकिहाळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

फलटण- फलटण : पत्रकारांची बांधिलकी व्यक्तीशी नव्हे, तर बातमीशी असली पाहिजे. मात्र आज काही पत्रकार व्यक्तीशी बांधिलकी जपत असल्याने पत्रकारितेच्या मूल्यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. पत्रकारितेतील हे धोके रोखण्यासाठी, पत्रकारांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी तसेच बदलत्या माध्यम क्षेत्रानुसार त्यांचे डिजिटल सक्षमीकरण आणि क्षमता विकास करण्यासाठी राज्यभर विशेष अभियान राबविण्याचा मानस असल्याचे महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी आणि महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक सहकारी संघाचे अध्यक्ष रविंद्र बेडकिहाळ यांनी सांगितले.

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीची ३९ वी आणि महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक सहकारी संघाची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा फलटण येथे रविंद्र बेडकिहाळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुकृत खांडेकर, कार्यकारी विश्वस्त विजय मांडके आणि ज्येष्ठ संचालक दिलीपसिंह भोसले प्रमुख उपस्थित होते.

रविंद्र बेडकिहाळ म्हणाले की, राज्यातील दोन जिल्ह्यांसाठी एक अशा पद्धतीने १८ ठिकाणी पत्रकार सक्षमीकरण अभियान आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये अभ्यासू माध्यमतज्ज्ञांचे मार्गदर्शन, मराठी पत्रकारितेच्या इतिहासावरील माहितीपट, जिल्हास्तरीय पत्रकारितेची माहिती पुस्तिका आदी उपक्रमांचा समावेश असेल. तसेच ज्येष्ठ पत्रकार, संपादक आणि पत्रकारांचे प्रलंबित प्रश्न सोडविणे व जाहिरात वितरण धोरणाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठीही संस्था शासन स्तरावर प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

# राजुरमध्ये प्रथमच ग्रामसभा खेळीमेळीच्या वातावरणात

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - आदिवासी भागातील सर्वात मोठी पेसा असलेली राजूर ग्रामपंचायतची ग्रामसभा प्रथमच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच संतोष बनसोडे होते.शासनाकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी मिळणारा तांडा, पेसा व दलित वस्ती वसुधार निधी संबंधित वस्त्यांमध्येच खर्च करावा, असा ठराव ग्रामसभेत करण्यात आला.



. सामाजिक कार्यकर्ते संतोष मुर्तडक यांनी तांडा निधी लक्ष्मीनारायण वॉर्डातील वंजारी समाजाच्या जागेत खर्च करून तेथे मोठे एकत्रित काम करावे, असा ठराव मांडला. त्यास काशिनाथ भडांगे यांनी अनुमोदन दिले.

सेवानिवृत्त अधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास येलमामे यांनी राजूरमधील तरुणांच्या बेरोजगारीचा प्रश्न उपस्थित केला. ग्रामपंचायतीने गावात गाळे बांधून ते बेरोजगार तरुणांना उपलब्ध करून द्यावेत, जेणेकरून त्यांना व्यवसायाची संधी मिळेल, असा ठराव त्यांनी मांडला. ग्रामसभेत सामाजिक कार्यकर्ते किरण माळवे, सोमनाथ मुर्तडक, दीपक देशमुख, अशोक मुर्तडक, संजय भडांगे, बाळासाहेब लहामगे, रामदास पवार, सचिन मुर्तडक आदी ग्रामस्थांनी विविध विषयांवर आपली मते मांडली.

यावेळी माजी सरपंच गणपतराव देशमुख, माजी उपसरपंच गोकुळ कानकाटे, ग्रामपंचायत सदस्य ओंकार नवाळी, हर्षल मुर्तडक, अतुल पवार, अक्षय देशमुख, राम बांगर, शेखर वालझाडे, संगीता मैड, रोहिणी माळवे तसेच यावेळी राजुर पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक परसराम तागड व पो .कॉ. मंडलिक आदी उपस्थित होते आदी उपस्थित होते.

# IISER पुणे कार्यशाळेत स्वामी समर्थ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची चमक

युवावार्ता (प्रतिनिधी)

माळवाडी (बोटा)- भारतातील अग्रगण्य संशोधन संस्था खखडएठ, पुणे येथे २६ जुलै रोजी आयोजित LAMP: Rapid DN- Screening in Health and Food Safety (Molecular Biology) या प्रात्यक्षिक कार्यशाळेत श्री स्वामी समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, माळवाडी (बोटा), ता. संगमनेर येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून संस्थेचा गौरव वाढविला.



या कार्यशाळेसाठी मयुरी ओहोल, शीतल थोरात, साक्षी मांडे व कार्तिकी बिडवे या विद्यार्थिनींची निवड झाली होती. त्यांच्यासमवेत प्रा. स्वप्नील वरे व प्रा. निशा वरे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी खखडएठ मधील अत्याधुनिक संशोधन प्रयोगशाळा व आधुनिक उपकरणांचीही पाहणी केली.

कार्यशाळेत LAMP तंत्रज्ञान, Rapid DN- Screening, Molecular Biology मधील प्रयोगशाळा तंत्र, जैविक नमुन्यांचे विश्लेषण, संशोधनातील सुरक्षितता व आधुनिक संशोधन पद्धतींचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. कार्यशाळेनंतर सहभागी विद्यार्थ्यांना IISER, पुणेतर्फे Completion Certificate प्रदान करण्यात आले. कार्यशाळेचे आयोजन डॉ. पूर्णिमा रवींद्रन यांनी केले, तर विद्यार्थ्यांच्या नोंदणी व समन्वयासाठी डॉ. सुशील एन. बेनके यांचे महाविद्यालयातर्फे आभार मानण्यात आले.

संस्थेचे सचिव डॉ. अमित पोखरकर यांनी सांगितले की, अशा हँड्स-ऑन प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांची संशोधन, फार्मास्युटिकल उद्योग, जैवतंत्रज्ञान आणि उच्च शिक्षणासाठीची तयारी अधिक सक्षम होते. अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या संशोधन संस्थेत प्रशिक्षणाची संधी मिळणे ही अभिमानाची बाब असून, त्यामुळे त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनाची आवड वाढत असल्याचे सांगितले.

## जाहीर नोटीस

यद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, श्री. मोहम्मद फरीदुद्दीन सदरुद्दीन शेख यांच्या मालकीचे खरेदीखत क्र. ४४०/२०१२, दिनांक १२/०१/२०१२, दुय्यम निबंधक कार्यालय, नाशिक येथे नोंदणीकृत असलेले मूळ खरेदीखत संगमनेर येथे हरविले आहे. सदर दस्तऐवजाचा सर्वतोपरी शोध घेऊनही तो मिळून आलेला नाही. सदर मूळ खरेदीखत कोणास मिळाल्यास कृपया खालील मोबाईल क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा.

**युनुस दादामिया देशमुख**
**संगमनेर, मो. ९८८१६२२७३२**

## जाहीर नोटीस

**मे. उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर यांचे कोर्टात**

**अतिक्रमण अर्ज नं. ५४२/२०२५**

आत्माराम गेणु मोरे - अर्जदार
**विरुध्द**
बाबुराव खंडु मोरे - रेस्पाँडट

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १३८ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जातील सा.वाला नं. ३ जनाबाई दत्तात्रय फंटागरे, द्वारा बाबुराव खंडु मोरे, सा.वाला नं. ४ रंगुबाई खंडु मोरे, सा.वाला नं.७ चहाबाई बबन मते, द्वारा बाबुराव खंडु मोरे, सा.वाला नं. ८ केशरबाई सुर्यभान आमले, द्वारा रामदास बाळाजी मोरे, सा. वाला नं. ९ रविंद्र भाऊसाहेब मोरे, सा.वाला नं. १० आशा सचिन ढोबळे, द्वारा रविंद्र भाऊसाहेब मोरे, सा. वाला नं. ११ शिल्पा संदेश लेंडे द्वारा रविंद्र भाऊसाहेब मोरे सा.वाला नं. १२ सुमनबाई भाऊसाहेब मोरे, सा.वाला नं. १५ रंजना गोविंद फंटागरे द्वारा सुभाष हरीभाऊ मोरे, सा.वाला नं. १६ प्रकाश वनाजी मोरे सा. वाला नं. १७ वेणुबाई वनाजी मोरे, सा.वाला नं. १८ सुनिता वसंत उगले द्वारा प्रकाश वनाजी मोरे, सर्व रा. नांदुर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि.अ.नगर यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील केलेले आहे. सदर सा. वाले यांना वारंवारं पोस्टामार्फत बजावणी केलेली आहे. परंतु पोस्टामार्फत बजावणी करुन देखील सदर सा.वाले हे सदर अर्जामध्ये हजर झालेले नाहीत. त्यामुळे उपरोक्त सा.वाले यांना सदर नोटीसीने या अर्जाचे कामकाजाबाबत सांगण्यात येत आहे. त्याअर्थी या नोटीसद्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर अर्जाचे कामकाजासंदर्भात तुम्ही स्वतः अथवा वकिलांमार्फत ता. १०/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर यांचे कामकाज यशवंतराव चव्हाण बिल्डींग, नविन नगर रोड, संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या ठिकाणी हजर राहावे. वर निर्दिष्ट केलेल्या तारखेस आपण हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल असे या नोटीसमार्फत सुचित करण्यात येत आहे. आज दि. ०५/०८/२०२६ रोजी माझे सही शिक्यानिशी तथा न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली आहे.

ठिकाण - संगमनेर

**मे. उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर**

## जाहीर नोटीस

**मे. उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर यांचे कोर्टात**

**आर.टी.एस. अपिल नं. ६४४/२०२५**

बाळासाहेब माधव दिघे - अपेलंट
**विरुध्द**
चंद्रभान गंगाधर राहाणे, वैगरे - रेस्पाँडट

ज्याअर्थी वरील अपेलंट यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जातील सा.वाला नं.५ विलास साहेबराव राहाणे, सा.वाला नं. ७ बाळासाहेब साहेबराव राहाणे, दोघे रा. बहादरपुर, ता. कोपरगाव, जि.अ.नगर, यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील केलेले आहे. सदर रेस्पॉइंट यांना वारंवारं पोस्टामार्फत बजावणी केलेली आहे. परंतु पोस्टामार्फत बजावणी करुन देखील सदर रेस्पॉइंट हे सदर अपिलामध्ये हजर झालेले नाहीत. त्यामुळे उपरोक्त रेस्पाँडंट यांना सदर नोटीसीने या अपिलाचे कामकाजाबाबत सांगण्यात येत आहे. त्याअर्थी या नोटीसद्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर अपिलाचे कामकाजासंदर्भात तुम्ही स्वतः अथवा वकिलांमार्फत ता. १०/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर यांचे कामकाज यशवंतराव चव्हाण बिल्डींग, नविन नगर रोड, संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या ठिकाणी हजर राहावे. वर निर्दिष्ट केलेल्या तारखेस आपण हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल असे या नोटीसमार्फत सुचित करण्यात येत आहे. आज दि.०५/०८/२०२६ रोजी माझे सही शिक्यानिशी तथा न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली आहे.

ठिकाण - संगमनेर

**मे. उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर**

## जाहीर नोटीस

**मे. उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर यांचे कोर्टात**

**आर.टी.एस. अपिल नं. २४०/२०२६**

बाळासाहेब माधव दिघे - अपेलंट
**विरुध्द**
मच्छिंद्र दगडु पवार, वैगरे - रेस्पाँडट

ज्याअर्थी वरील अपेलंट यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जातील सा.वाला नं.३ किसनाबाई निवृत्ती खाडे उर्फ चंद्रकला मधुकर गवळी, सा. वाला नं.५ सुरेखा रमेश थोरात, दोघे रा. खांबाळे, ता. सिन्नर जि. नाशिक, सा.वाला नं. ८ शोभा भाऊपाटील आहेर. रा. निळवंडे, ता. संगमनेर, जि.अ.नगर यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील केलेले आहे. सदर रेस्पॉइंट यांना वारंवारं पोस्टामार्फत बजावणी केलेली आहे. परंतु पोस्टामार्फत बजावणी करुन देखील सदर रेस्पाँडंट हे सदर अपिलामध्ये हजर झालेले नाहीत. त्यामुळे उपरोक्त रेस्पॉइंट यांना सदर नोटीसीने या अपिलाचे कामकाजाबाबत सांगण्यात येत आहे. त्याअर्थी या नोटीसद्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर अपिलाचे कामकाजासंदर्भात तुम्ही स्वतः अथवा वकिलांमार्फत ता. १०/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर यांचे कामकाज यशवंतराव चव्हाण बिल्डींग, नविन नगर रोड, संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या ठिकाणी हजर राहावे. वर निर्दिष्ट केलेल्या तारखेस आपण हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल असे या नोटीसमार्फत सुचित करण्यात येत आहे. आज दि.०५/०८/२०२६ रोजी माझे सही शिक्यानिशी तथा न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली आहे.

ठिकाण - संगमनेर

**मे. उप विभागीय अधिकारी साहेब, संगमनेर**

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

## CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME

TANESH AMREKLAL PANJABI

TANESH AMRIKLAL PANJABI

NEW NAME AS

TANESH AMREKLAL PAPDEJA


## त्वरित भरती आजच संधीचा लाभ घ्या

**सर्व्हिस अॅडव्हायझर – 01 जागा**
शैक्षणिक पात्रता :- ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल डिप्लोमा
अनुभव :- फ्रेशर किंवा कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये १ वर्षाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**स्पेअर पार्ट्स बिलिंग – 01 जागा**
कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये स्पेअर पार्ट्स बिलिंगचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.

इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.

पत्ता - घुलेवाडी
ता. संगमनेर, जि. अ.नगर

मो. ९४२२७३५५६४

## पाहिजेत

एक पुरुष कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
– संपर्क –
7972999316

## फ्लॅट विकणे आहे

2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

## फॅकल्टी पाहिजे अगस्ती अकॅडमी संगमनेर

ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
**पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स**
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
**AMVI – 461 जागा MPSC** (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.

सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू

| MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा |
|---|---|---|---|---|

अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन

पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५

6005401510
9209645727







## दिनविशेष

२०१०: — भारतातीलजम्मू आणि काश्मीर भागात भयानक पूर आला.
१९९७: — कोलंबो येथे भारताविरुद्धच्या कसोटी सामन्यात श्रीलंकेने ६ बाद ९५२ अशी विक्रमी धावसंख्या उभारली. त्यात सनत जयसूर्या याने ३४० धावा केल्या.
१९९४: — डॉ. शिवराम कारंथ यांना राष्ट्रपती डॉ. शंकरदयाळ शर्मा यांच्या हस्ते इंदिरा गांधी पर्यावरण पुरस्कार प्रदान.
१९९०: — कुवैत बळकावल्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी इराकवर व्यापारी बंधने लादली.
१९६२: — जमैकाला इंग्लंडपासुन स्वातंत्र्य मिळाले.
१९६०: — अमेरिकेने घातलेल्या व्यापारबंदीला प्रत्युत्तर म्हणून क्युबाने अमेरिकन बँकांसह सर्व परदेशी बँकाचे राष्ट्रीयीकरण केले.
१९४५: — जपान मधील हिरोशिमा या शहरावर अमेरिकेने अणुबाँब टाकला. इतिहासात पहिल्यांदा अणुबाँबचा वापर करण्यात आला.
१९४०: — सोविएत युनियनने इस्टोनियाचा बेकायदेशीरपणे ताबा घेतला.
१९२६: — जेरट्रूड एडर्ले ही इंग्लिश खाडी पोहुन जाणारी पहिली महिला बनली.

## जन्म

१९७५: शेखर गवळी — भारतीय क्रिकेटपटू (निधन: १ सप्टेंबर २०२० )
१९७०: M. रात्री श्यामलन — भारतीय-अमेरिकन दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथा लेखक
१९७०: एम. नाईट श्यामलन — भारतीय-अमेरिकन चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक
१९६५: विशाल भारद्वाज — भारतीय चित्रपट दिग्दर्शक
१९५९: राजेंद्र सिंग — भारतीय पर्यावरणवादी
१९४०: मुखु अलीयेव — दागेस्तान प्रजासत्ताकाचे २रे प्रमुख, रशियन भाषाशास्त्रज्ञ आणि राजकारणी
१९३४: पियर्स अँथनी — इंग्रजी-अमेरिकन सैनिक आणि लेखक
१९२५: योगिनी जोगळेकर — भारतीय लेखिका (निधन: १ नोव्हेंबर २००५ )
१९२२: फ्रेडी लेकर — इंग्रज उद्योगपती, लेकर एअरवेज कंपनीचे संस्थापक (निधन: ९ फेब्रुवारी २००६ )

## मृत्यू

२०२२: तामो मिबांग — भारतीय शैक्षणिक प्रशासक, राजीव गांधी विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: १ जुलै १९५५ )
२०२२: साजिद पट्टलम — भारतीय अभिनेते
२०१९: सुषमा स्वराज — भारतीय राजकारणी, दिल्लीच्या ५व्या मुख्यमंत्री आणि भारताच्या पहिल्या महिला माजी परराष्ट्रमंत्री, प्रभावी वक्त्या व लोकनेत्या म्हणून प्रसिद्ध — पद्मविभूषण (मरणोत्तर) (जन्म: १४ फेब्रुवारी १९५२ )
२००१: कुमार चॅटर्जी — भारतीय नौदल प्रमुखआधार (जन्म: २२ नोव्हेंबर १९१४ )
१९९९: कल्पनाथ राय — राजकीय नेते (जन्म: ४ जानेवारी १९४१ )
१९९७: बीरेन्द्रकुमार भट्टाचार्य — भारतीय आसामी साहित्यिक — साहित्य अकादमी पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार (जन्म: १४ ऑक्टोबर १९२४ )
१९९१: हॅरी रिझनर — अमेरिकन पत्रकार, 60 मिनिटस मासिकाचे सह-संस्थापक (जन्म: १७ एप्रिल १९२३ )
१९९१: शापूर बख्तियार — ईराणचे ७४ वे पंतप्रधान (जन्म: २६ जून १९१४ )
१९८५: फोर्ब्स बर्नहॅम — गयानीज वकील आणि राजकारणी, गयाना देशाचे २रे अध्यक्ष (जन्म:




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०६ ऑगस्ट**

# जम्मू-काश्मीरमधील भीषण पूर निसर्गाच्या रौद्ररूपाची झळ



सन २०१० मध्ये भारतातील जम्मू-काश्मीर राज्याला अतिवृष्टीमुळे भीषण पुराचा सामना करावा लागला. मुसळधार पावसामुळे अनेक नद्या आणि नाले दुथडी भरून वाहू लागले. विशेषतः झेलम नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाल्याने अनेक शहरे आणि गावे पाण्याखाली गेली. या पुरामुळे हजारो नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवावे लागले, तर अनेक घरे, रस्ते, पूल आणि सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान झाले.या नैसर्गिक आपत्तीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. अनेक भागांचा संपर्क तुटल्याने अन्न, पिण्याचे पाणी, औषधे आणि इतर अत्यावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. शेतीचे मोठे नुकसान झाले आणि हजारो हेक्टरवरील पिके वाहून गेली. अनेक शाळा, शासकीय कार्यालये आणि व्यापारी आस्थापने बंद ठेवावी लागली.पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी भारतीय लष्कर, वायुसेना, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF) आणि स्थानिक प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर बचाव व मदतकार्य राबविले. हेलिकॉप्टरद्वारे अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यात आली तसेच अन्नधान्य, औषधे आणि आवश्यक साहित्याचा पुरवठा करण्यात आला. स्वयंसेवी संस्थांनीही मदतकार्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला.या आपत्तीने जम्मू-काश्मीरमधील आपत्ती व्यवस्थापनाची गरज अधोरेखित केली. हवामानातील बदल, अनियंत्रित शहरीकरण आणि नदीकाठावरील अतिक्रमणे यामुळे अशा नैसर्गिक आपत्तींचा धोका वाढत असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले. त्यामुळे पूरनियंत्रण व्यवस्था अधिक सक्षम करणे, नदीपात्रांचे संवर्धन, आधुनिक पूर्वसूचना प्रणाली विकसित करणे आणि नागरिकांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले.जम्मू-काश्मीरमधील हा पूर नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी सज्ज यंत्रणा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारी एक महत्त्वाची घटना म्हणून ओळखला जातो.

# भारताच्या प्रभावी महिला नेत्या सुषमा स्वराज यांना आदरांजली

**पुण्यतिथी विशेष**

भारतीय राजकारणातील एक करिष्माई, अभ्यासू आणि जनसामान्यांशी सहज संवाद साधणाऱ्या नेत्या म्हणून सुषमा स्वराज यांचे नाव आदराने घेतले जाते. १४ फेब्रुवारी १९५२ रोजी हरियाणातील अंबाला येथे त्यांचा जन्म झाला. त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर वकिली केली आणि अल्पवयातच सक्रिय राजकारणात प्रवेश केला. त्यांच्या ओजस्वी वक्तृत्वामुळे आणि प्रभावी नेतृत्वामुळे त्या भारतीय जनता पक्षाच्या प्रमुख महिला नेत्यांपैकी एक बनल्या.वयाच्या अवघ्या २५व्या वर्षी त्या हरियाणा सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री बनल्या. १९९८ मध्ये त्यांनी दिल्लीच्या पाचव्या मुख्यमंत्री म्हणूनही अल्पकाळ जबाबदारी सांभाळली. त्यानंतर त्या अनेक वेळा लोकसभेवर निवडून आल्या आणि केंद्रीय माहिती व प्रसारण, आरोग्य, संसदीय कामकाज आदी महत्त्वाच्या खात्यांची धुरा त्यांनी यशस्वीपणे सांभाळली.२०१४ ते २०१९ या काळात सुषमा स्वराज यांनी भारताच्या परराष्ट्रमंत्री म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली. या पदावर काम करणाऱ्या त्या भारताच्या पहिल्या पूर्णवेळ महिला परराष्ट्रमंत्री ठरल्या. परदेशात अडचणीत सापडलेल्या भारतीय नागरिकांना तातडीने मदत करण्यासाठी त्यांनी सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर केला. ट्विटरद्वारे त्यांनी हजारो भारतीयांना मदत मिळवून दिली. त्यामुळे त्या जनतेच्या मनात अत्यंत लोकप्रिय ठरल्या. परराष्ट्र धोरणात संवेदनशीलता, तत्परता आणि मानवी दृष्टिकोन यांचा उत्कृष्ट समन्वय त्यांनी साधला.सुषमा स्वराज या केवळ राजकारणी नव्हत्या, तर



त्या एक उत्कृष्ट संसदीय वक्त्या होत्या. संसदेतील त्यांच्या प्रभावी भाषणांमुळे विरोधकही त्यांचा आदर करत. त्यांची अभ्यासू मांडणी, संयमी स्वभाव आणि सर्वपक्षीय नेत्यांशी असलेले सौहार्द यामुळे त्यांना व्यापक मान्यता मिळाली.६ ऑगस्ट २०१९ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणाने एक संवेदनशील, कर्तव्यदक्ष आणि जनतेसाठी सदैव उपलब्ध असलेली नेत्या गमावली. त्यांच्या राष्ट्रसेवेचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांना २०२४ मध्ये मरणोत्तर पद्मविभूषण या देशातील दुसऱ्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविले.सुषमा स्वराज यांचे जीवन हे प्रामाणिक राजकारण, लोकसेवा, प्रभावी नेतृत्व आणि मानवी मूल्यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. भारतीय राजकारण आणि परराष्ट्र धोरणातील त्यांच्या योगदानाची नोंद सुवर्णाक्षरांनी घेतली जाईल.

# नाशिक -पुणे रेल्वे मार्गासाठी आम्हीही लढ्यात सहभागी आहोत




## पुणे - नाशिक रेल्वे मार्ग संगमनेर मार्गे होणे आवश्यक



माजी प्राचार्य
**डॉ. कचरदास बैरागी**
पुणे
मूळगाव: राजापूर, ता. संगमनेर

पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्गाला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी देऊन संगमनेर, सिन्नर, नारायणगाव, जुन्नर व राजगुरुनगरसह परिसरातील ग्रामीण विकासाला चालना देणे गरजेचे आहे. हा मार्ग सुरू झाल्यास शिक्षण, उद्योग, रोजगार आणि शेती क्षेत्राला मोठा फायदा होईल. पुणे हे शिक्षणाचे केंद्र तर नाशिक सांस्कृतिक व आध्यात्मिक नगरी आहे. या दोन्ही शहरांमध्ये शिक्षण, नोकरी व व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणावर प्रवास करणाऱ्या ग्रामीण नागरिकांना हा मार्ग अत्यंत उपयुक्त ठरेल. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण सहज उपलब्ध होईल आणि परिसरातही शैक्षणिक संस्था विकसित होण्यास मदत मिळेल.

या भागात कांदा, टोमॅटो, बटाटा, डाळिंब, दूध व भाजीपाला यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. रेल्वेमार्गामुळे शेतीमालाची देश-विदेशातील बाजारपेठांपर्यंत जलद वाहतूक होऊन शेतकऱ्यांना अधिक चांगला दर मिळू शकेल. तसेच वाहतूक, पर्यटन, हॉटेल व्यवसाय, लघुउद्योग आणि गुंतवणुकीला चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल. या मार्गामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आपल्या गावात राहून पुणे व नाशिक येथे नोकरी करणे सोपे होईल. परिणामी शहरी स्थलांतर कमी होऊन दोन्ही शहरांवरील लोकसंख्येचा ताणही कमी होण्यास मदत होईल.

एकूणच, पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्ग हा ग्रामीण विकास, शिक्षण, शेती आणि उद्योगांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प ठरू शकतो.

## नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे ही विकासाची जीवनवाहिनी ठरेल



**– बाळासाहेब आंबरे**
संस्थापक,
अल्फाटेक सिस्टम्स, नाशिक
मुळगाव– गणोरे, ता. अकोले

मी गणोरे, तालुका अकोले येथील रहिवासी असून उद्योजक म्हणून नाशिकमध्ये कार्यरत आहे. व्यावसायिक कारणांमुळे मला वारंवार पुण्याला जावे लागते. सध्या नाशिक-पुणे प्रवासासाठी लागणारा जास्त वेळ, महामार्गावरील वाहतूक कोंडी आणि वाढता इंधन खर्च यामुळे हा प्रवास अत्यंत खर्चिक व त्रासदायक ठरत आहे. अशा परिस्थितीत नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्प साकार झाला, तर माझ्यासारख्या हजारो प्रवाशांचा प्रवास जलद, सुरक्षित, आरामदायी आणि किफायतशीर होईल. याचबरोबर या मार्गावरील उद्योजक, शेतकरी, विद्यार्थी, नोकरदार आणि व्यावसायिक यांनाही मोठा फायदा होईल. या प्रकल्पामुळे उद्योगांना चालना मिळेल, रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक विकासाला मोठी गती मिळेल.

हा प्रकल्प केवळ वाहतुकीचा नसून उत्तर महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. त्यामुळे या परिसरातील सर्व नागरिक, उद्योजक, शेतकरी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांना माझे मनापासून आवाहन आहे की, सर्वांनी राजकारणाच्या पलीकडे जाऊन या जनहिताच्या प्रकल्पासाठी एकजूट दाखवावी. आमदार सत्यजित तांबे यांनी सुरू केलेल्या या जनआंदोलनाला आपण सर्वांनी सक्रिय पाठिंबा देऊया.

एकत्रित प्रयत्नांच्या बळावर नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्प निश्चितच मार्गी लागेल, असा मला विश्वास आहे. चला, या विकासाच्या लढ्यात सहभागी होऊया आणि कोणत्याही परिस्थितीत नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे झालीच पाहिजे हा निर्धार प्रत्यक्षात उतरवूया.

## नाशिक-नगर-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे ही काळाची गरज



**– माणिकराव देशमुख**
उद्योजक, पुणे
मूळगाव: कोतूळ, (भोळेवाडी)
ता. अकोले, जि. अहिल्यानगर

नाशिक-नगर-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे हा नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे जिल्ह्यांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा रेल्वे मार्ग यापूर्वीच सुरू व्हायला हवा होता. मात्र, प्रकल्पाला मंजुरी मिळाली, भूसंपादन पूर्ण झाले, कोट्यवधी रुपयांची नुकसानभरपाईही वितरित करण्यात आली आणि त्यानंतर अचानक हा प्रकल्प रद्द करण्यात आल्याची घोषणा झाली. ही बाब अत्यंत दुर्दैवी, निषेधार्ह आणि या तीनही जिल्ह्यांतील नागरिकांचा अपमान करणारी आहे.

आजच्या वाढत्या लोकसंख्येच्या, वाहतूक कोंडीच्या आणि औद्योगिक विकासाच्या पार्श्वभूमीवर नाशिक-नगर-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे ही केवळ गरज नसून काळाची मागणी आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास लाखो प्रवाशांचा वेळ वाचेल, उद्योग-व्यवसायांना चालना मिळेल, विद्यार्थी, शेतकरी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होईल.

म्हणूनच या रेल्वे प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांनी पक्षीय भेद विसरून एकत्र यावे आणि हा प्रकल्प पुन्हा मार्गी लावण्यासाठी उभारल्या जाणाऱ्या जनआंदोलनात सहभागी व्हावे. आमदार सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या लढ्याला व्यापक जनसमर्थन मिळणे आवश्यक आहे. आपल्या आणि भावी पिढ्यांच्या विकासासाठी ही रेल्वे मिळविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने संघर्ष करावा, असे मी आवाहन करतो.

## सर्वांगीण विकासाची जीवनवाहिनी




**माणिकराव डावरे**
उद्योजक, पुणे
मुळगाव – निंब्रळ, ता. अकोले

नाशिक-पुणे रेल्वे मार्ग हा केवळ एखाद्या तालुक्याचा किंवा जिल्ह्याचा विकास करणारा प्रकल्प नसून, संपूर्ण उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा महत्त्वाचा दुवा आहे. हा रेल्वे मार्ग उभारल्यास शिक्षण, उद्योग, रोजगार, दळणवळण, व्यापार आणि पर्यटन अशा अनेक क्षेत्रांना मोठी चालना मिळणार आहे.

आज अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी पुणे आणि नाशिक येथे प्रवास करतात. रेल्वे मार्गामुळे त्यांचा वेळ, खर्च आणि प्रवासाचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल. तसेच विविध शासकीय व खासगी कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही सुरक्षित, जलद आणि किफायतशीर प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. या मार्गाचा सर्वाधिक फायदा औद्योगिक क्षेत्राला होणार आहे. नाशिक आणि पुणे ही दोन्ही औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाची शहरे आहेत. रेल्वे मार्गामुळे कच्चा माल आणि तयार मालाची वाहतूक अधिक वेगवान व कमी खर्चात होईल. त्यामुळे नवीन उद्योग उभे राहतील, गुंतवणूक वाढेल आणि स्थानिक युवकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. परिणामी बेरोजगारी कमी होण्यास मोठी मदत मिळेल. याशिवाय शेतीमाल, फळे, भाजीपाला आणि दुग्धजन्य पदार्थांची वाहतूक सुलभ होऊन शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला चांगला बाजार मिळेल. धार्मिक आणि पर्यटनस्थळांनाही या रेल्वेमार्गामुळे अधिक पर्यटक मिळतील, ज्याचा थेट फायदा स्थानिक अर्थव्यवस्थेला होईल. म्हणूनच नाशिक-पुणे रेल्वे मार्गाकडे केवळ वाहतुकीचा प्रकल्प म्हणून न पाहता, तो शिक्षण, उद्योग, रोजगार आणि विकासाचा महामार्ग म्हणून पाहणे आवश्यक आहे.

## लवकर अंमलबजावणी करावी



**श्रीरंग महिपती हारदे**
उद्योगपती, नाशिक
मुळगाव – मांडवे, ता.संगमनेर

पुणे-नाशिक सरळ रेल्वे प्रकल्पासाठी सिन्नर-अकोले-संगमनेर-नारायणगाव-आंबेगाव-राजगुरुनगर-चाकण हा मार्ग सर्वाधिक सोयीचा असून, या मार्गामुळे उद्योग, शिक्षण, रोजगार, शेती आणि व्यापार क्षेत्राला मोठी चालना मिळेल, असे मत श्रीरंग महीपती हारदे यांनी व्यक्त केले आहे.

या सरळ रेल्वे मार्गामुळे विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर, कामगार, उद्योजक आणि व्यापारी यांना मोठा लाभ होणार आहे. शेतकऱ्यांना आपला शेतीमाल कमी वेळेत आणि कमी खर्चात मोठ्या बाजारपेठांमध्ये पोहोचवता येईल. त्यामुळे शेतीमालाला योग्य भाव मिळण्यास मदत होईल. अकोले तालुक्यासह आदिवासी भागातील नागरिकांना शिक्षण, रोजगार आणि उद्योगांच्या नव्या संधी उपलब्ध होतील. ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी वाढतील, तर अनेक गावे विकासाच्या मुख्य प्रवाहात येतील. या रेल्वे मार्गामुळे ग्रामीण जीवनमान उंचावण्यास मदत होईल आणि खेडोपाड्यांमध्ये लघुउद्योगांना चालना मिळेल. दळणवळण अधिक वेगवान आणि सुलभ झाल्याने परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल. त्यामुळे पुणे-नाशिक सरळ रेल्वे मार्ग कोणत्याही परिस्थितीत या मार्गानेच साकार व्हावा, अशी येथील नागरिकांची तीव्र अपेक्षा आहे.

तरी शासनाने जनभावनेचा आदर करून पुणे-नाशिक सरळ रेल्वे प्रकल्पाच्या या मार्गावरील कामास तातडीने सुरुवात करावी, अशी मागणी श्रीरंग महीपती हारदे यांनी केली आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर



दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com



आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# क्रांतीदिनानिमित्त संगमनेरात 'जेन झी आंदोलकांचे जंतरमंतरवरील अनुभव'



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : ऑगस्ट क्रांतीदिनाचे औचित्य साधत सत्यशोधक विचार मंच, संगमनेर यांच्या वतीने रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता व्यापारी असोसिएशन हॉल येथे एक आगळावेगळा आणि समकालीन विषयावर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दिल्लीतील जंतरमंतर येथे शिक्षणाशी संबंधित विविध मागण्यांसाठी देशभरातील जेन झी (ऋशप न) तरुण-तरुणींनी उभारलेल्या आंदोलनात संगमनेर परिसरातील काही युवक-युवतींनीही प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. आंदोलनादरम्यान त्यांनी अनुभवलेले प्रसंग, संघर्ष, पोलिसी कारवाई आणि आंदोलनातील वातावरण याविषयीचे प्रत्यक्ष अनुभव या कार्यक्रमात ते उपस्थितांसमोर मांडणार आहेत.

या विशेष कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे संगमनेरची भूमीकन्या तसेच पुणे-मुंबईतील डिजिटल माध्यमांमध्ये कार्यरत असलेल्या विख्यात राजकीय पत्रकार नेहा सराफ कंकरेज या या जेन झी आंदोलकांची मॅरेथॉन मुलाखत घेणार आहेत. विविध आंदोलकांच्या अनुभवातून जंतरमंतरवरील घडामोडींचे वास्तव जाणून घेण्याची संधी या कार्यक्रमातून नागरिकांना मिळणार आहे.

सत्यशोधक विचार मंचाचे समन्वयक संदीप काकड यांनी नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले असून, कार्यक्रमाबाबत सूचना अथवा अभिप्राय असल्यास त्यांच्याशी संपर्क साधण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. संगमनेरकरांनी या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमास उपस्थित राहून जंतरमंतरवरील आंदोलनाचे प्रत्यक्षदर्शी अनुभव ऐकावेत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**कार्यक्रमाचे तपशील**

**विषय : जेन झी आंदोलकांचे जंतरमंतरवरील अनुभव**
**दिनांक : रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ (क्रांती दिन)**
**वेळ : सायंकाळी ६.०० वाजता**
**स्थळ : संगमनेर, व्यापारी असोसिएशन हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, पडतानी कॉम्प्लेक्स, संगमनेर, जि. अ. नगर**

# राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा

## अकोल्यात दोन हजार विद्यार्थ्यांसह छात्रभारतीचा एल्गार



युवावार्ता (प्रतिनिधी)

कनिष्ठ महाविद्यालयांतील ४५ मिनिटांची तासिका ४० मिनिटांवर आणली आहे, विज्ञान शाखेतील प्रात्यक्षिकांच्या बॅच रचनेत बदल केला आहे, कला शाखेतील वैकल्पिक विषयांच्या तुकड्या कमी झाल्याने शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. त्यामुळे गोरगरिबांचे शिक्षण वाचवा, तानाशाही नको, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ बंद करा, अशा घोषणा देत छात्र भारतीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

अकोले येथे छात्रभारती विद्यार्थी संघटनेच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा विराट मोर्चा तहसील कार्यालयावर काढण्यात आला. या मोर्चात सुमारे दोन हजार विद्यार्थी सहभागी झाले. शिक्षण क्षेत्रातील विविध निर्णयांविरोधात विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मोर्चानंतर प्रतिनिधीमंडळाने तहसीलदारांना निवेदन दिले. विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर लवकर सकारात्मक निर्णय न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रात विद्यार्थी आंदोलनांची मालिका उभारण्यात येईल. राज्यभर विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना सोबत घेऊन व्यापक लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा छात्रभारती विद्यार्थी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा शिक्षक भारती संघटना राज्यभर छात्रभारती विद्यार्थी संघटना आणि पालकांसोबत लोकशाही मार्गाने व्यापक आंदोलन उभारेल, असा इशारा शिक्षक भारतीचे राज्य नेते प्रा. महेश पाडेकर यांनी दिला.

कनिष्ठ महाविद्यालयांतील प्रवेश प्रक्रिया दीर्घकाळ सुरू राहिल्याने शिक्षकांना नियमित अध्यापनाऐवजी प्रशासकीय कामांमध्ये गुंतवले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष अध्यापनाचे दिवस कमी होत असून शैक्षणिक वर्षावर त्याचा परिणाम होत आहे.

याशिवाय, बारावीची राज्य मंडळाची परीक्षा आता जानेवारी महिन्यात होत असल्याने अभ्यासासाठी उपलब्ध कालावधी आणखी कमी झाला आहे. संघटनेने शासनाच्या संचमान्यता प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यात दुरुस्ती करण्याची मागणी केली.

या आंदोलनाचे नेतृत्व छत्रपती संघटनेचे राज्याध्यक्ष अनिकेत घुले, राज्य संघटक विशाल शिंदे, तालुकाध्यक्ष सुदर्शन रुपवते आदींनी केले.


पान १ वरून -


# समितीचा फार्स की...

विशेष म्हणजे, या आंदोलनात जेन-झी तरुणाई मोठ्या प्रमाणात उतरली असून सोशल मिडियावर सरळ रेल्वेमार्गाच्या समर्थनार्थ व्यापक जनजागृती सुरू आहे. गावागावांत बैठका, जनसंपर्क आणि नागरिकांचे संघटन वेगाने होत असल्याने आंदोलन अधिक व्यापक होण्याची चिन्हे आहेत.

या प्रश्नावर सध्या विविध पक्षांकडून आरोप-प्रत्यारोप सुरू असले, तरी जनतेचा भर राजकीय श्रेयवादावर नसून विकासावर आहे. पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्गामुळे संगमनेरसह नाशिक, अकोले, सिन्नर, जुन्नर, खेड आणि परिसरातील उद्योग, शेती, व्यापार, पर्यटन व रोजगाराला मोठी चालना मिळणार असल्याचा नागरिकांचा विश्वास आहे. त्यामुळे जीएमआरटीच्या अडचणीवर वैज्ञानिक आणि तांत्रिक तोडगा काढून मूळ पुणे-संगमनेर-नाशिक सरळ रेल्वेमार्गालाच मंजुरी द्यावी, अशी एकमुखी मागणी होत आहे.

काकोडकर समितीचा अहवाल पुढील ६० दिवसांत येणार असला, तरी जनतेचा संयम संपत चालला आहे. सरकारने समितीच्या अहवालाची प्रतीक्षा न करता विकासाला प्राधान्य देत ठोस भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सरळ रेल्वेमार्ग हा केवळ प्रवासाचा प्रश्न नाही; तो उत्तर महाराष्ट्राच्या विकासाचा, उद्योगांचा, शेतकऱ्यांच्या भविष्याचा आणि लाखो नागरिकांच्या स्वप्नांचा प्रश्न आहे. आता समिती नव्हे, तर निर्णय हवा, अशीच जनतेची ठाम भूमिका बनली आह आता जर हा मार्ग झाला नाही तर पुढील शंभर, दोनशे वर्षे हा मार्ग होण्याची शक्यता नाही. त्यामुळे हाच अंतिम लढा समजून नागरिकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.


सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. धुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता



चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाउंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382


# पावसात प्लास्टिकचा कागद धरून अंत्यसंस्कार; तळेवाडीत स्मशानभूमी कधी ?

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

पोखरी बाळेश्वर ग्रामपंचायतीअंतर्गत तळेवाडी येथे स्मशानभूमी नसल्याने एका कुटुंबाला भर पावसात अत्यंत हालअपेष्टांमध्ये अंत्यसंस्कार करावे लागल्याची हृदयद्रावक घटना घडली. आईच्या निधनानंतर भाऊसाहेब दिघे यांच्या कुटुंबासमोर अंत्यविधी कुठे करायचा, असा प्रश्न निर्माण झाला. अखेर शेतातच चिता रचण्यात आली; मात्र मुसळधार पावसामुळे वरून प्लास्टिकचा कागद धरून अंत्यसंस्कार पूर्ण करावे लागले.

तळेवाडीत आजही स्मशानभूमी नसल्याने प्रत्येक पावसाळ्यात ग्रामस्थांना अशाच अडचणींचा सामना करावा लागत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली. या घटनेनंतर गावात तातडीने स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून आवश्यक सुविधा उभारण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे. आमच्या वाडीत स्मशानभूमी नसल्याने आईच्या अंत्यसंस्कारावेळी अक्षरशः हाल सहन करावे लागले. असा प्रसंग पुन्हा कोणावरही येऊ नये. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी भाऊसाहेब दिघे यांनी केली.


नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटिव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605



अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13



कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६



दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25